# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय**:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या 23 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 175 /सन 2023-24

फोर्ट, मुंबई 400001 दिनांक: 27/07/2023

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
4. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
5. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईंदर / वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल / भिवंडी-निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
6. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
7. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
8. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
9. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
10. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
11. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण (SRA)
12. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
13. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
14. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
15. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
16. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
17. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
18. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
19. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप.
20. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
21. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
22. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
23. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ** :- या कार्यालयचे पत्र क्र.जा.क्र./ल.ले/166/सन 2023-24 दि.17.07.2023.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 23 **वी** बैठक **गुरुवार, दिनांक** 20.07.2023 रोजी **मा. सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

Anita Patil 26/7/23

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 23 वी बैठक**
**दिनांक 20.07.2023 रोजीचे इतिवृत्त**
**मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.**

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 23 वी बैठक समितीचे सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. सह-अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | श्री. एस. व्ही. रामाराव (व्ही.सी.द्वारे) | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 2. | मुख्य वन संरक्षक प्रादेशिक, ठाणे (व्ही.सी.द्वारे) | मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक यांचे प्रतिनिधी | मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक, ठाणे यांचे कार्यालयs |
| 3. | श्री. मकरंद प्र. देशमुख | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 4. | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 5. | श्री. आदर्श रेड्डी (व्ही.सी.द्वारे) | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. | मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला |
| 6. | श्री.एस.एन.रेड्डी (व्ही.सी.द्वारे) | उप वनसंरक्षक, सावंतवाडी | उप वनसंरक्षक, सावंतवाडी यांचे कार्यालय |
| 7. | श्री. तुषार जी. शिंदे (व्ही.सी.द्वारे) | संचालक एमएनपीएस, एम.एम.आर.डी.ए | एम.एम.आर.डी.ए. (MMRDA) |
| 8. | श्री. संजय शिंदे (व्ही.सी.द्वारे) | उप-आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| 9. | श्री. सुधाकर जगताप (व्ही.सी.द्वारे) | उपायुक्त, कल्याण –डोंबिवली मनपा | कल्याण -डोंबिवली मनपा |
| 10. | डॉ. सागर घोलप | उपायुक्त, वसई विरार मनपा | वसई विरार महानगरपालिका |
| 11. | श्री. धनाजीराव धायगुडे (व्ही.सी.द्वारे) | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर |
| 12. | श्री. दिपक खाडे (व्ही.सी.द्वारे) | विभागीय वन अधिकारी, चिपळून | विभागीय वन अधिकारी, चिपळून यांचे कार्यालय |
| 13. | श्री. चंद्रकांत वि. सुर्यवंशी (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| 14. | श्री. सतिश बागल (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 15. | श्री. सुदाम परदेशी (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| 16. | श्री. मच्छिंद्र सुकटे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | श्री. सुभाष भागडे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| 18. | श्री. संदेश शिर्के (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड | जिल्हाधिकारी रायगड |
| 19. | श्री. प्रविण साळुंखे (व्ही.सी.द्वारे) | मुख्य वास्तुविशारद व नियोजनकार, म्हाडा | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे कार्यालय(MHADA) |
| 20. | श्री. जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको | सिडको कार्यालय (Cidco) |
| 21. | श्री. अजय वानखेडे | उप नियोजनकार (पर्यावरण), सिडको | सिडको कार्यालय (Cidco) |
| 22. | श्रीमती अनघा कदम | उपायुक्त ठाणे मनपा (पी.सी.ओ) | ठाणे महानगरपालिका |
| 23. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 24. | श्रीमती तेजस्विनी पाटील (व्ही.सी.द्वारे) | तहसिलदार, जिल्हाधिकारी रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| 25. | श्री. मनोज न. चव्हाण | पर्यावरण (HOD) | पनवेल महानगरपालिका |
| 26. | श्री. तन्मय बोरे (व्ही.सी.द्वारे) | नगररचना कार्यकारी अभियंता | वसई-विरार शहर महानगरपालिका |
| 27. | श्री. पुरुषोत्तम जाधव | उप वास्तुविशारद, एमआयडीसी | एमआयडीसी (MIDC) |
| 28. | श्री. जितेंद्र जगदाळे | एसीपी, ठाणे पोलीस | ठाणे पोलीस आयुक्तालय |
| 29. | श्री. प्रशांत मर्दे | सहाय्यक पोलीस आयुक्त | पोलीस उपायुक्त (अभियान), मुंबई |
| 30. | श्री. राहुल गायकवाड (व्ही.सी.द्वारे) | सहाय्यक पोलीस आयुक्त | तुर्भे नवी मुंबई विभाग |
| 31. | श्री. ए.एस.नंदवते | एसआरओ, एमपीसीबी, मुंबई | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कार्यालय |
| 32. | श्री. ए.एन.काटोले | एसआरओ, एमपीसीबी, ठाणे | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कार्यालय |
| 33. | श्री. शेख शखील | एसआरओ, एमपीसीबी, ठाणे | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कार्यालय |
| 34. | श्री. जयश्री जुनेरीकर | FO, एमपीसीबी, नवी मुंबई | एमपीसीबी, नवी मुंबई |
| 35. | श्री. सुदेश अ. परब | सहा. आयुक्त, नवी मुंबई मनपा परि-1 | नवी मुंबई मनपा, परि.1 |
| 36. | श्री. उदय लोकरे | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 37. | श्री. भुषण वाघमारे | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 38. | श्री. चंद्रकांत विभुती | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 39. | TMC ADMC | (व्ही.सी.द्वारे) | ठाणे महानगरपालिका |
| 40. | श्रीमती लक्ष्मी सूर्यवंशी | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 41. | श्री. मृगंक प्रभू | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 42. | श्री. नितेश चौधरी | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 43. | श्री. नितिन विजयकर | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 44. | श्री. प्रकाश मिसाळ | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 45. | श्री. रुपेश महाले | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 46. | एसडीओ कुडाळ | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 47. | एसआरओ रत्नागिरी | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 48. | श्रीमती विशाखा सावंत | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 49. | श्री. अनुपम वर्मा | (व्ही.सी.द्वारे) | - |

| | | | |
|---|---|---|---|
| 50. | श्री. अंकुश आर. मस्के | पोलीस निरीक्षक, सुरक्षा, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 51. | श्री. व्ही. के. गांधी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी |
| 52. | श्री. किशोर रिठे (व्ही.सी.द्वारे) | सचिव, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी |
| 53. | श्री. राहुल खोत (व्ही.सी.द्वारे) | उप संचालक | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी |
| 54. | श्री. स्टॅलिन डी. | संचालक, वनशक्ती | वनशक्ती |
| 55. | श्रीमती. हेमा रमाणी (व्ही.सी.द्वारे) | बी.ई.ए.जी. यांचे प्रतिनिधी | बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप |
| * | MCZMA | अनुपस्थित | |
| * | सॉल्ट पॅन विभाग (मीठागरे विभाग) | अनुपस्थित | |
| * | बृहन्मुंबई महानगरपालिका | अनुपस्थित | |

- व्हि.सी. मधील उपस्थित काही सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे फक्त नावांची नोंद केलेली आहे.

<table>
<tr><th>अ. क्र</th><th>विषय</th><th>करावयाची कार्यवाही</th></tr>
<tr><td>1</td><td>कांदळवन क्षेत्र हस्तांतरीत करणेबाबत.</td><td>

• सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका 87/2006 अन्वये पारित केलेल्या कांदळवन क्षेत्राच्या हस्तांतरणांच्या आदेशांबाबत समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच खाली नमूद केले प्रमाणे कांदळवन कक्ष, मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे जिल्हानिहाय / शासकीय विभागनिहाय (महसूल तसेच इतर विभाग) संबंधित विभागाच्या अधिपत्याखालील असलेले कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यासाठी प्रलंबित असल्याचे सांगितले.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>जिल्हा</th><th>शासकीय विभाग</th><th>क्षेत्र (हेक्टर)</th><th>शेरा</th></tr>
<tr><td></td><td>(1)</td><td>(2)</td><td>(3)</td><td>(4)</td></tr>
<tr><td>1.</td><td>सिंधुदूर्ग</td><td>महसूल</td><td>58.49</td><td></td></tr>
<tr><td>2.</td><td>रत्नागिरी</td><td>महसूल</td><td>1094.28</td><td></td></tr>
<tr><td>3.</td><td>पालघर</td><td>वसई-विरार महानगरपालिका</td><td>811.85</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">4.</td><td rowspan="2">रायगड</td><td>सिडको</td><td>628.68</td><td>कांदळवन क्षेत्राची माहिती दिली परंतु हस्तांतरण केले नाही.</td></tr>
<tr><td>सिडको</td><td>638</td><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानूसार सर्व कांदळवन क्षेत्र प्रकल्पांसाठी राखीव न ठेवता वन विभागास हस्तांतरीत करणे अनिवार्य आहे.</td></tr>
<tr><td>5.</td><td>ठाणे</td><td>महसूल</td><td>91.30</td><td></td></tr>
<tr><td>6.</td><td>मुंबई शहर</td><td>महसूल</td><td>23.71</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">7.</td><td rowspan="2">मुंबई उपनगर</td><td>महसूल</td><td>11.84</td><td></td></tr>
<tr><td>महसूल</td><td>108.36</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td>**एकूण**</td><td>**3466.51**</td><td></td></tr>
</table>

• उपरोक्त नमूद 3466.51 हेक्टर कांदळवन क्षेत्रा व्यतिरिक्त महसूल अथवा इतर शासकीय विभागांच्या अधिनस्त असलेल्या कांदळवन क्षेत्राबाबत संबंधित विभागाने समितीच्या पुढील बैठकीत माहिती सादर करावी जेणेकरुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे कांदळवन क्षेत्राची हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होईल.

• तसेच सदरचे कांदळवन क्षेत्र वनविभागास हस्तांतरीत करण्यापूर्वी त्या क्षेत्राचे सर्व्हे सीमांकन (Survey Demarcation) करुनच संबंधित क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्याच्या सूचना मा.सह-अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच सदर क्षेत्राचे सर्व्हे सीमांकन (Survey Demarcation) करण्यासाठी लागणारा निधी प्राधान्याने जिल्हयाच्या DPDC निधीतून उपलब्ध करुन घ्यावा व कांदळवन क्षेत्राचे भूमीअभिलेख कार्यालयाकडून सर्वे सीमांकन करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे कांदळवन क्षेत्र

</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी. तथापि निधीच्या उपलब्धतेबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, कार्यालयाशी संपर्क करावा. कांदळवन क्षेत्राच्या सर्वे सीमांकनाच्या प्रक्रियेतील अडथळे दूर करुन त्याच्या जलद हस्तांतरणासाठी सर्व्हे सीमांकन करण्यासाठी आवश्यक निधी कांदळवन प्रतिष्ठान (Mangrove Foundation) तर्फे पुरविण्याचे आश्वासन समितीचे सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी दिले. |
| 2 | जिल्हा / तालुका अंतर्गत कांदळवन संरक्षण व संवर्धन तक्रार निवारण समिती गठीत करणेबाबत. | • संबंधित जिल्हाधिकारी/तहसिलदार यांनी जिल्हा / तालुका स्तरीय समिती गठीत करुन त्यांच्या दरमहा बैठका घेऊन बैठकीचे इतिवृत्त (Minutes) समितीकडे तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत समितीचे सदस्य सचिव यांनी पुनश्चः सूचित केले. |
| 3 | कांदळवन तक्रारींबाबत जिल्हा / तालुका स्तरीय समितींच्या दरमहा बैठका घेणे. | • मागील बैठकीत मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या. |
| 4 | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत. | • समितीच्या बैठकींना संबंधित विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत प्रगती होत असल्याबाबत सदस्य सचिव यांनी सांगितले. तथापि मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशांचे पालन होण्याच्या दृष्टिने तसेच सर्व तक्रारींचे निराकरण होण्यासाठी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित राहून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती समितीला देण्याची सूचना सदस्य सचिव यांनी केली. |
| 5 | डेब्रिज हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत. | • सदर विषयाच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी पालघर यांनी मागील बैठकीत दिलेल्या निर्देशांनूसार वसई – विरार महानगरपालिकेस डेब्रिज हटविण्यासाठी येणाऱ्या खर्चाबाबत अंदाजपत्रक (Estimate) तयार करण्यासाठी कळविले असल्याचे सांगितले. सदरचे डेब्रिज हटविल्यानंतर त्या जागेवर कांदळवन कक्ष अथवा पालघर जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव असलेले सहायक वनसंरक्षक (कांदळवन कक्ष) यांचे मार्फत कांदळवनाची पुर्नलागवड (Restoration) करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.<br>• तथापि, डेब्रिज हटविल्यानंतर ते कोणत्या पर्यायी जागेत टाकण्यात (Dumping) येईल, याबाबतचे नियोजन समितीस कळविणे आवश्यक असल्याचे समितीच्या अशासकीय सदस्य असलेल्या श्रीमती हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप तसेच बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे सचिव श्री. किशोर रिठे यांनी सूचित केले.<br>• या अनुषंगाने समितीचे सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी खाली नमूद पाच टप्प्यानूसार संबंधित यंत्रणांनी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>1. सद्यस्थितीत जिल्हाधिकारी (महसूल) अथवा महानगरपालिका अथवा संबंधित यंत्रणा यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या डेब्रिजच्या जागेची संयुक्त पाहणी संबंधित विभागाचे नोडल अधिकारी / प्रतिनिधी (तहसलिदार/सहायक आयुक्त/वनपरिक्षेत्र अधिकारी) आणि समितीचे अशासकीय सदस्य यांनी करावी. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी महसूल यांनी आवश्यकते नियोजन करावे.<br>2. डेब्रिजचे आकारमान (Quantification) निश्चित करणे.<br>3. डेब्रिज हटविल्यानंतर टाकण्यासाठी पर्यायी जागा.<br>4. डेब्रिज हटविण्यासाठीचे नियोजन व कार्यवाही.<br>5. डेब्रिज हटविल्यानंतर सदर जागेवर कांदळवनाची पुर्नलागवड (Restoration) करणे. |
| 6 | श्री. धिरज परब व श्री. | • या विषयीच्या चर्चेदरम्यान उपायुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी श्री.धिरज परब |

| | | |
|---|---|---|
| | अमजद खान यांच्या तक्रारींबाबत. | यांच्या 6 तक्रारींपैकी 6, श्री. अमजद खान यांचे 100 तक्रारींपैकी 64 तक्रारी व 35 तक्रारींपैकी 9 तक्रारींवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर केल्याचे सांगितले. तथापि उर्वरित तक्रारींबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना सदस्य सचिव यांनी दिली. तसेच याबाबत कांदळवन कक्षाचे संबंधित विषयान्वये विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., मुंबई यांनी 135 तक्रारींबाबत अहवाल सादर केल्याचे तसेच यातील केवळ 4 तक्रारी कांदळवन कक्षाशी संबंधित असल्याचे उपस्थितांस सांगितले. |
| 7 | Restoration संदर्भात चर्चा. | • मागील बैठकीत मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिलेले निर्देश तसेच विषय क्र. 3 च्या अनुषंगाने मा. सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या. |
| 8 | टोल फ्री क्रमांकाबाबत मा. अध्यक्षांनी दिलेल्या सूचनेनूसार केलेली कार्यवाही. | • याबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कांदळवन व पाणथळ क्षेत्राच्या ऱ्हासाबाबतच्या तक्रारी प्राप्त करण्याकरिता स्वतंत्र टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करुन त्यास व्यापक अशी प्रसिध्दी दिलेली असल्याचे दि.17.07.2023 रोजीच्या पत्रान्वये समितीस कळविले आहे.<br>• जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या दि.19.07.2023 रोजीच्या पत्रान्वये कांदळवनाच्या व पाणथळाच्या ऱ्हासाच्या तक्रारीकरीता टोल फ्री क्रमांक 1800-233-2686 उपलब्ध करण्यात आले असल्याचे कळविले आहे.<br>• तथापी जिल्हाधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी यांचे कार्यालयाकडून टोल फ्री क्रमांकाबाबत माहिती समितीस अप्राप्त आहे. |

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.20.07.2023 रोजीच्या बैठकीतील तक्रारींचा सद्यस्थितीचा जिल्हानिहाय गोषवारा**

| जिल्हा | एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | 2 | 2 | 0 |
| मुंबई उपनगर | 73 | 50 | 23 |
| ठाणे | 102 | 72 | 30 |
| पालघर | 16 | 6 | 10 |
| रायगड | 53 | 37 | 16 |
| रत्नागिरी | 3 | 3 | 0 |
| सिंधुदुर्ग | 4 | 2 | 2 |
| **एकूण** | 253 | 172 | 81 |

Rama Rao

**(एस.व्ही.रामाराव)**

**सह अध्यक्ष,**

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**

**तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

## कांदळवन समितीच्या तक्रारींवर केलेली कार्यवाही

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 1 | तक्रार क्र.12 श्री. लुक मेंन्डीस दि.30.11.2018<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • मा.अध्यक्षांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 2 | तक्रार क्र.21 श्री.बी.एन.कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.09.12.2018<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • मा.अध्यक्षांनी बृहन्मुंबई महानगरपालिका, सॉल्ट पॅन विभाग यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>2. सॉल्ट पॅन विभाग<br>3. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 3 | तक्रार क्र.83 श्री.बी.एन.कुमार दि.01.08.2018<br>Mangrove killing along Sion-Panvel highway - Request for rapid action force. | | |
| 4 | तक्रार क्र.118 श्री. हरीश पांडे दि.25.01.2020<br>Large scale CRZ 1 reclamation & mangroves destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai. | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.24.08.2022 रोजीच्या अहवालानूसार नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी मा.उच्च न्यायालय यांचेकडील O.O.C.J. PIL writ petition No. 15/2010 च्या अनुषंगाने जमिनीचा मोजणी अहवाल कोणासही देण्यास कोणतेही कार्यवाही करणेस मनाई असल्याने सदर जागेची मोजणी तुर्तास करता येणार नाही, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयास कळविले असल्याचे नमूद केले आहे. सदर मताशी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर सहमत असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीने सदर जागेची गुगल अर्थद्वारे तपासणी केली असता सदर ठिकाणी सन 2010 नंतर ही कांदळवनाची तोड करुन अतिक्रमण होत असल्याने संबंधितांवर गुन्हा दाखल करुन 2010 नंतर झालेल्या अतिक्रमणाबाबत नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.<br>• मा.अध्यक्षांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व विभागीय वन अधिकारी यांना या तक्रारीबाबत सद्यस्थितीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. कुर्ला. |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | श्रीम.आदिती प्रधान.<br>तक्रार क्र. 69<br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West.<br>दि.20.04.2019 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.12.02.2020 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाण हे मौजे वर्सोवा, ता.अंधेरी स.क्र.120 अ, येथील मिळकत "महाराष्ट्र हौसिंग बोर्ड" यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिस हे कांदळवन क्षेत्र व त्यापासून ५० मीटरच्या आत आहे.<br>• तद्नूसार मा.मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे.<br>• तद्नूसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा यांच्या दि.08.06.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे – वर्सोवा, ता. अंधेरी येथील स.न.120, न.भू.क्र.1374 अ या ठिकाणी स्थळपाहणी करण्यात आली असून दि.16.03.2023 रोजीचा पंचनामा, संबंधित जागेचे छायाचित्रे समितीस पाठविण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिज हे कांदळवन क्षेत्रात टाकण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा |
| 6 | श्री. स्टॅलिन डी. तक्रार क्र. 160<br>Request to respect Municipal Commissioner Carter Road at Bandra Mangrove pollution.<br>दि.18.10.2021 | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दि.23.08.2022 रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर फरशीचे तुकडे, डांबर गोळे, प्लॅस्टिकचे तुकडे इ. भराव निदर्शनास आले आहे.<br>• त्याअनुषंगाने कांदळवन व समुद्रकिनारी क्षेत्रात झालेली भरणी / भराव काढून टाकून सदर ठिकाण पुर्ववत करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.05.01.2022 रोजीच्या पत्रान्वये तसेच उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.06.07.2022 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>• तदनुसार मा.अध्यक्षांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर क्षेत्रात झालेली भरणी काढून टाकून जागा पुर्ववत करण्याचे निर्देश दिले होते. तथापी अहवाल अप्राप्त असल्याने मा.अध्यक्षांनी या तक्रारीबाबत पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | तक्रार क्र.181 श्री. अमजद खान – 21.02.2022 – मौजे एरंगळ गाव, मालाड (प) ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर येथील (CTS) भू.क्र. २०५३-सी, २०५३-सी, २०५५-अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी या जागेवर कांदळवनापासून १ मीटर परिसराचे आत रहेजा बिल्डर्स या विकासकामार्फत रहेजा एक्सोटिका बिल्डींग नं. ९ अ, बिल्डींग नं. ९ ब, सीएचई-९४५४-बीपी/डब्लुएस/अेपी या इमारतीचे बांधकाम करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचा अवमान केलेबाबत. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचा दि.05.06.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानूसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या 3 इमारती या सन 2005 नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून 50 मी.च्या बाहेर आहे. तसेच जी.पी.एस.रिंडींग क्र.4 च्या ठिकाणी असलेली भितीचे बांधकाम मढ प्लॉट पासून 50 मी. आत येत आहे. परंतु, सदर पत्र्याचे बांधकाम सन 2005 च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे.<br>• सदर मिळकत ही खासगी मिळकत असल्याने तहसीलदार बोरीवली यांनी दि.01.03.2023 रोजीच्या पत्रान्वये या खासगी मिळकतीवर डेब्रीजची मोठ्या प्रमाणावर भरणी केल्याने संबंधितांवर MRTP कायद्यानुसार योग्यती कार्यवाही करण्यास सहा. आयुक्त, पी/ उत्तर विभाग यांना कळविले असल्याचे नमूद केले आहे. | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |
| 8 | तक्रार क्र. 193 श्री. योगेश केणी –दि.15.07.2022<br>CTS No. 1583 मालवणी गाव साई दर्या ढाबाच्या मागे मार्वे रोड मालवणी चर्च, मालाड पश्चिम, मुंबई येथे कॉन्ट्रॅक्टर यांच्याद्वारे सरकारी जागेवर अतिक्रमण करीत, सदर जागेवर असलेल्या मॅग्रोजच्या झाडाची मोठया प्रमाणात कत्तल करुन तेथे बेकायदेशीर भराव करुन त्यावर बनविलेले अंदाजे 3000 चौ. फुटाचे सिमेंट विटाचे डब्बल माळयाचे पक्के अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याबाबत. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचा दि.06.06.2023 रोजीच्या अहवालानूसार सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार श्री. धनेश कोळ यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे भारतीय दंड संहिता 1960 मधील कलम 441, 447 अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 120 अन्वये गु.र.क्र.1273/2021 दि. 25.09.2021 अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.<br>• सदर जागेवरील अतिक्रमणे निष्कासीत करणेबाबत प्र. उपजिल्हाधि कारी (अति/निष्का) मालाड यांना तहसिलदार बोरीवली यांनी दि. 08.06.2022 व 02.02.2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• प्रकरणी तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नसून सदर जागेवर सन 2005 व सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनापासून 50 मी. च्या बाहेर येत असल्याने प्रस्तुत तक्रार निकाली काढण्याची विनंती केली आहे. | - |
| 9 | तक्रार क्र. 196 श्रीमती श्वेता वाघ – दि. 22.09.2022 Dumping of debris, and destruction of mangrove habitat in versova near KPS memorial school. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.31.03.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाण राखीव वन म्हणून अधिसूचित झालेली असून सदर मिळकतीचा ताबा दि.09.04.2021 रोजी वनविभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी वनविभागामार्फत गु.क्र.E/34/2021-22, दि.23.10.2021 अन्वये वनगुन्हा नोंदवण्यात | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आला आहे. जागेवर रस्त्याचे काम चालू असताना 1 डंपर व 2 जे.सी.बी. ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. प्रकरणी वनविभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु असल्याबाबत नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला यांना या तक्रारीबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | |
| 10 | तक्रार क्र. 202 श्री.रेजी अब्राहम, मुंबई<br>Destruction of Mangroves on 40 plus acres of govt land at prime location in borivali dahisar belt off Link Road.<br>Date:29.11.2022 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या अहवालानुसार तक्रार अर्जातील नमुद क्षेत्र हे मौजे एक्सर स.क्र. 85/3, 85/5 मधील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रार अर्जातील क्षेत्र हे या विभागाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर असल्याने तहसिलदार बोरीवली व तक्रारदार रेजी अब्राहम यांना कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तात्काळ अहवाल सादर करावा असे निर्देश दिले होते. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 11 | तक्रार क्र. 204 श्री.अली असगर मोहमद तहसिलदार, मालाड<br>मालवणी परिसरातील कांदळवन नष्ट करणारे भुमाफिया व महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदार यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत.<br>दि : 07.11.2022 | • मा.अध्यक्षांनी पोलीस आयुक्त, मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. पोलीस आयुक्त, मुंबई शहर<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>4. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 12 | तक्रार क्र. 206 श्रीमती. श्वेता भट<br>Destruction of Mangroves by way of construction of walls at creeks along the Malad Marve road area, Malad West.<br>दि : 21.12.2022 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या अहवालानुसार तक्रार अर्जातील क्षेत्र हे मालवणी व वळणई येथील आहे. सदर क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रार अर्जातील क्षेत्र 50 मी. आत बफर झोन मध्ये येत आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार बोरीवली यांना उचित कार्यवाहीसाठी कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तात्काळ अहवाल सादर करावा असे निर्देश दिले होते. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| 13 | तक्रार क्र.207 श्री. झोरु भातेना, मुंबई दि. 06.01.2022<br>जुहू कोळीवाडा बीच या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास व अतिक्रमण झाले असल्याबाबत. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी यांचे दि.04.07.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत महसूल | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>3. MCZMA |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागाकडून दि.01.04.2022 रोजी FIR 0251 अन्वये सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे या विभागाकडील सदर तक्रार निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे. | |
| 14 | तक्रार क्र.216 श्री.सुमित अशोक धुरी.<br>Merciless killing of Mangroves, illegal reclamation & encroachment of Forest land and constructions.<br>दि. 26.02.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा<br>3. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 15 | तक्रार क्र.217 श्रीमती गुंजन गुप्ता.<br>Burning of Mangroves in Malad West (Near Mindspace/Evershine Nagar)<br>दि. 27.02.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |
| 16 | तक्रार क्र.221 श्री.स्टॅलिन डी.<br>Illegal construction of toilet block in ESZ are next to forest boundary and in CRZ.<br>दि. 13.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, संचालक, पर्यावरण विभाग व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. MCZMA<br>3. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 17 | तक्रार क्र.227 Switsy Henriques, Borivali<br>Gorai Police station fails to accept FIR against mangroves being cut.<br>दि. 13.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुंबई |
| 18 | तक्रार क्र.228 श्रीमती भाविता दुंगार<br>दि. 11.04.2023<br>व श्री.अभिषेक कदम दि. 06.04.2023<br>Encrochment in CRZ and Forest areas near Marve Road. | • मा.अध्यक्षांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यकअभियंता (घ.क.व्य.), पी/उत्तर<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>3. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 19 | तक्रार क्र.229 श्रीमती मिली शेट्टी<br>Fire on Mangrove at charkop Sector 8<br>दि. 28.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | तक्रार क्र.230 श्री.राहुल एम व श्री.झायलीया सेलवम<br>Enchoachment happening on the mangroves in charkop sector 8 behind Sun Rise building.<br>दि. 14.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 21 | तक्रार क्र.232 श्री.रेजी अब्राहम<br>Large Scale ongoing rabid dumping & illegal construction on adjacent huge govt plots next to charkop creek at charkop sector 8 to build unapproved illegal chawls.<br>दि. 21.04.2023 | • मा.अध्यक्षांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>3. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 22 | तक्रार क्र.236 श्री. संजय सिंघ गणपत पाटील नगर, CTS No. 532, सर्व्हे नं. 221, एक्सार विलेज, न्यू लिंक रोड, दहिसर पश्चिम येथील तक्रारीबाबत. दि.23.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 23 | तक्रार क्र. 250 श्री. सुमित अशोक धुरी<br>No Action Taken so far for Request regaring quashing of Building permissions, Fire NOC and stringent action for large scale construction in CRZ area. दि.27.06.2023. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 12.07.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 24 | तक्रार क्र. 251 श्री. अजित गोम्स<br>Destruction of Mangroves near Chheda Nagar – Chembur<br>दि.29.06.2023. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 12.07.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **ठाणे जिल्ह्यातील कांदळवन तक्रारी** | |
| 25 | तक्रार क्र. 17 श्री. धिरज परब, दि.05.12.2018<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मिरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • जिल्हाधिकारी ठाणे यांचे दि.06.06.2022 रोजीच्या प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता, विषयांकित प्रकरणी उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे यांच्या वस्तुस्थितीदर्शक अहवालानुसार मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथे कांदळवनाचा ऱ्हास झाला म्हणून यापूर्वी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त)<br><br>2. विभागीय वन अधिकारी व BEAG यांचे प्रतिनिधी |
| 26<br><br><br><br><br>27 | तक्रार क्र.9 श्री. जयेश गुप्ता – दि.24.11.2018<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe - Desai -Khardi, Thane.<br><br>तक्रार क्र. 201 श्री. स्टॅलिन डी.<br>Illegal dumping of waste in CRZ, pollution of air and water. Illegal Sand Mining.<br>Date : 29.09.2022 | • ठाणे महानगरपालिकेच्या दि.01.03.2023 रोजीच्या पुन:श्च प्राप्त अहवालानुसार मौजे खर्डी, दिवा येथील खाजगी मालकीचे भूखंड क्र.३७,३७,५०,५५, व ६१ यावर स्थानिक नागरीकांमार्फत मोठे खड्डे करण्यात आलेले होते त्या ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथे लिचेट संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती व संकलित लिचेटची विल्हेवाट कौसा सांडपाणी प्रकिया केंद्र येथे लावण्यात येत होती. सदर खाडीमध्ये मासे मेल्याची कोणतीही तक्रार ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त नाही. पालिकेतर्फे दि.31.01.2023 पासून दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करण्यात आलेले आहे तसेच मौजे भंडार्ली येथे घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथील Legacy Waste बाबत शासन निर्णयानुसार बायोरेमिडीएशन प्रकिया करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथील धुराचा त्रास कमी करण्यासाठी कायम स्वरूपी पाण्याच्या tanker ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालिकेतर्फे 1200 TPD प्रती क्षमतेचा Waste to Energy प्रकल्पाचा टप्पा मार्च 2023 मध्ये सुरु करण्यात येत असुन दुसरा टप्पा विजनिर्मिती डिसेंबर 2023 मध्ये सुरु करण्यात येणार आहे असे नमुद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी यांच्या दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील ठिकाण अधिसूचित कांदळवन क्षेत्र असल्यामुळे रौ.गु.क्र.-03/2023 दि.01.02.2023 अन्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही चालू | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा. अध्यक्षांनी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना या तक्रारीबाबतचा अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | |
| 28 | तक्रार क्र. 76 श्री. धिरज परब:- भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. दि.23.04.2018 | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सदर तक्रारीतील नमूद जागेवर 2005 साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सदर जागेवर डेब्रीज टाकून सपाटीकरण करून वाहन पार्किंगकरीता त्या जागेचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.<br>• कांदळवनांचा ऱ्हास झाल्या प्रकरणी कांदळवन (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये श्री. रामचंद्र जे. वैष्णव, श्री.श्यामसुंदर राधेशाम अग्रवाल, श्री. शुभम मुरलीधर अग्रवाल यांचे विरुध्द भाईंदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र.23/2020 दि.30.01.2020 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 रोजीच्या अहवालानुसार "डेब्रीज व माती भराव काढण्याचे निर्देश" ही बाब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेशी संबंधित असलेबाबत कळविण्यात आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना आपले स्तरावरुन निर्देश देणेबाबत विंनती केली आहे.<br>• त्याअनुषंगाने मा. अध्यक्षांनी सदर ठिकाणी यापुढे कांदळवनाचा ऱ्हास होणार नाही तसेच डेब्रीज काढणेबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याच्या सूचना मिरा-भाईंदर, महानगरपालिका यांना दिले होते. | 1. मिरा – भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त) |
| 29 | तक्रार क्र. 77 श्री. धिरज परब:- मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मिरा रोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळचा ऱ्हास करून CRZ चे उल्लंघन. दि.11.06.2018 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील नमुद क्षेत्र हे मौजे भाईंदर स.नं.147, 151 व 146 मधील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सद्यस्थितीत काही भागात तिवर व मेस्वाक ही कांदळवनाची झाडे आहेत व काही जागेवर चाळीचे बांधकाम केलेले दिसून येत आहे. सदर क्षेत्र खाजगी व सरकारी असल्याने महसूल खात्याने त्यावर कार्यवाही करावी.<br>• सदर ठिकाणावर तहसिलदार मिरा-भाईंदर यांना | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असता दि.10.06.2021 रोजीच्या अहवालानुसार सदर बाब मिरा-भाईंदर महानगरपालिकेशी संबंधित असल्याचे कळविले आहे.<br>• या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले होते. | |
| 30 | तक्रार क्र. 104 श्री. धिरज परब दि.19.11.2019.<br>भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट केलेबाबत तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास प्रकरणी. | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमूद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. सद्यस्थितीत मौजे भाईंदर स.क्र.342/1 ही जागा सरकारी असून, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यासाठी आरक्षित आहे. स.क्र.342/1 च्या एकूण क्षेत्रापैकी 103.8320 हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 नुसार राखीव कांदळवन म्हणून घोषित केले आहे. कांदळवनांचा ऱ्हास झाला असल्याचे नमूद केले आहे.<br>• तसेच सदरची जागा मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अखत्यारीत असल्याने सदर ठिकाणी झालेला माती भराव काढून टाकणे, कुंपण गेट तयार करुन महापालिकेचे सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सदर जागेत खाजगी वाहनांची पार्किंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• मा.अध्यक्षांनी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना आगार व्यवस्थापक परिवहन मंडळ, ठाणे यांच्या जागेवर झालेल्या कांदळवन ऱ्हासाबाबत उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1.मिरा-भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त)<br><br>2. आगार व्यवस्थापक, परिवहन मंडळ, ठाणे |
| 31 | तक्रार क्र.150 श्री. स्टॅलिन डी. दि.09.04.2021 Apparent Land grab, illegal construction and destruction of Mangroves, Coastal wetlands and CRZ 1 areas at Dive region. Illegal construction of cement mixing plant at Dive. | • विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.27.10.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमूद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीतही नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• मा. अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे व ठाणे महानगरपालिका यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | तक्रार क्र. 153 श्री.रोहीत जोशी दि.17.06.2021 Huge reclamation of creek at Mumbra-Diva | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि.25.10.2022 रोजीच्या अहवालानूसार सदर स्थळाची दि.25.06.2022 रोजी पाहणी केली असता, सदरचा रस्ता हा दिवा प्रभाग समिती अंतर्गत नव्याने घटीत झालेल्या प्रभाग क्र.43 मध्ये येत आहे. या परिसरात काही ठिकाणी चुहा ब्रिजच्या बाजूला डेब्रिजची भरणी केल्याचे आढळले. या रस्त्याच्या काही भूखंडाची **मालकी वन विभागाची** असल्याचे जागेवर लावलेल्या जाहिरात फलकावरुन दिसून येते. तरी सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही करण्याकरिता **वन विभागास निर्देश देणे** उचित असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.23.11.2022 रोजीच्या अहवालानूसार नमूद क्षेत्रापैकी मौजे दिवा स.क्र.236 मध्ये काही भागात अंदाजे 2.45 हेक्टर राखीव कांदळवन क्षेत्रात सिमेंट, विटा, रेती या डेब्रीजचा कचरा टाकल्याने व सदर ठिकाणी मोठी भिंत बांधून पाम क्रिक हॉटेल बांधल्याने श्री. गणेश निळकंठ पाटील यांचे विरुध्द वनक्षेत्रपाल ठाणे यांनी वनगुन्हा नोंदविला आहे. सदर अतिक्रमणातील भिंत व काही भाग दि.02.11.2022 रोजी निष्कासित करण्यात आले असून सदर क्षेत्राची हद्द निश्चित झाल्यानंतर उर्वरित क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करणेत येईल.<br>• तसेच अधिसुचित क्षेत्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी झालेल्या रेती उत्खननाबाबत वनक्षेत्रपाल, ठाणे यांचे दि.22.08.2022 रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, ठाणे यांना संयुक्त स्थळपाहणी करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा. अध्यक्षांनी श्री. गणेश पाटील यांच्या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी ठाणे व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना कांदळनाच्या झाडांची व पर्यावरणाची हानी केल्याबाबत उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. ठाणे महानगरपालिका<br>3. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. |
| 33 | तक्रार क्र. 192 श्री. गणेश पाटील – दि.13.07.2022<br>मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान करुन मौजे दिवा येथे आदित्य गोयल यांच्या जमिनीतील मॅग्रोजच्या झाडांची कत्तल व पर्यावरणाची हानी करुन होत असलेल्या बेकायदेशीर रेती उत्खननाबाबत. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 34 | तक्रार क्र. 170 श्री. अमजद खान — दि.21.02.2022 — मौजे पेणकरपाडा ता. जि. ठाणे जु.स.नं.२०६, नवीन सं.नं. ३८/२ या जागेवर कांदळवनापासून ५० मी. परिसरात कांदळवनाची कत्तल व भरणी करुन, त्यावर विकासक / भुमाफिया यांनी अनधिकृतरित्या कांदळवनालगत पत्र्याचे कुंपण करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केल्याबाबत. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे, मिरा-भाईंदर महानगरपालिका, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने, अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार कांदळवनाचा ऱ्हास झाला असून या कार्यालयाचे पत्र दि. 22.06.2023 नूसार मंडळ अधिकारी, भाईंदर यांना संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका (अहवाल प्राप्त)<br><br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. |
